पुण्येनगरी दि. २०/०३/२०२२



पुण्येनगरी दि. २०/०३/२०२२

# ३५ हजारांची देशी व विदेशी दारु जप्त

## ३ जणांना अटक

नायगाव /प्रतिनिधी

नायगाव तालुक्यतील कृष्णूर येथे कुंटुर पोलिसांनी देशी विदेशी दारु विक्री करणाऱ्यांवर धाड टाकून ३५ हजार ७०० रुपयांची देशी व विदेशी दारु जप्त केली. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे.ही कारवाई धुलिवंदन दिनी म्हणजे १८ मार्च रोजी करण्यात आली.

शासनाने धुलीवंदनाच्या दिवशी १८ मार्च रोजी देशी विदेशी दारुची दुकाने बंद करावीत असा आदेश जारी केला होता. या आदेशाचे उल्लंघन करुन अनेक ठिकाणी देशी विदेशी दारुची खुलेआम विक्री केली गेली. परवानाधारक देशी व विदेशी दारूची दुकाने बंद केल्यानंतर नायगाव तालुक्यातील कुंटूर पोलीस ठाण्याच्या अंतर्गत असलेल्या मौजे कृष्णूर येथील व्यंकटी दत्तात्रय जाधव यांच्या घरासमोर आरोपी सदाशिव व्यंकट जाधव, राजेश कदम यांनी विनापरवाना दारुची विक्री सुरु केली. ही माहिती मिळाल्यावर कुंटूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक महादेव पुरी यांनी कृष्णूरमध्ये धाड टाकली.या धाडीत विदेशी दारूसह आरोपीला फौजदार संजय आटकोरे व बिट जमादार संतोष कुमरे यांनी ताब्यात घेतले. ही घटना १८ मार्च २०२२ रोजी घडली. अन्य एका घटनेत कृष्णूर येथे दुसऱ्या ठिकाणी गडगा येथील सुधाकर व्यंकटी बोईनवाड (ह.मु. कृष्णूर,ता.नायगाव) हा विनापरवाना देशी दारू बाळगून विक्री करीत असताना कुंटूर पोलिसांनी धाड टाकून त्याला पकडले.



त्याच्याकडून ५ हजार ८० रुपयांच्या देशी दारूच्या ९३ बॉटल्या बीट जमादार एस.एम.कुमरे, पोकाँ अशोक घुमे यांनी जप्त केल्या. या आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

गोदातीर समाचार २०/०३/२०२२

# दहा लाखांची खंडणी मागणाऱ्या दोघांना विमानतळ पोलिसांनी पकडले

## तीन दिवसांची पोलीस कोठडी

गोदातीर समाचार २०/०३/२०२२

**नांदेड–** भाऊ कारागृहात असल्याची बतावणी करून त्याला सोडण्यासाठी दहा लाख रुपयांची खंडणी मागून तलवारीने चार चाकी वाहनावर हल्ला करणाऱ्या दोघांना विमानतळ पोलिसांनी अटक केली आहे. या दोघांनाही न्यायालयाने पोलीस कोठडीत पाठवले आहे. पोलीस निरीक्षक संजय ननवरे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळू गिते यांनी आपल्या पथकासह काल रात्रभर





मुसक्या आवळल्या.

नांदेड शहराच्या गंगानगर सोसायटी येथील व्यापारी रामाश्रय विश्वनाथ सहाने (वय ३७) हे दि. १४ मार्च रोजी रात्री साडेदहाच्या समारास आपल्या घराकडे जात